| MHSN060000491989 | **<u>नियमित दिवाणी दावा : ७९/१९८९</u>**<br>शामराव पोवार (मयत) तर्फे वारस वि.<br>श्रीमती. हौसाबाई चव्हाण (मयत) तर्फे वारस |
|---|---|

## <u>निशाणी क्र. १६१ वरील आदेश</u>

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १.६ यांनी कॉस्ट भरणेकामी झालेली दिरंगाई माफ होऊन त्यांची कैफीयत दाखल करुन घेणेकामी दाखल केलेला आहे.

**२.** प्रतिवादी यांच्या कथनानुसार, त्यांचे विरुध्द पारीत झालेला एकतर्फा आदेश दि.०२/०२/२०२४ रोजी नि.१५७ नुसार मे. न्यायालयाने र.रु.१,०००/– कॉस्ट भरणेवर मंजूर केला होता. परंतु, काही अपरिहार्य कारणामुळे प्रतिवादी यांना कॉस्ट भरणेकामी दिरंगाई झालेली आहे. तरी झालेली दिरंगाई माफ होऊन आज रोजी कॉस्ट भरुन घेणेत यावी व त्यांची कैफीयत वाचून दाखल करणेत यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

**३.** वादी यांनी सदर अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादीच्या अर्जातील कथने नाकारलेली आहेत. त्यांचे कथनानुसार, सदरचा अर्ज या स्टेजला देणेचा प्रतिवादीस अधिकार नसल्यामुळे तो चालणेस पात्र नाही. अर्जात कॉस्ट भरणेस झालेला उशीर माफ होणेस काहीही योग्य व संयुक्तिक कारण नमूद केलेले दिसत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली.

**४.** अर्ज वाचला. अर्जाचे, प्रकरणाचे व दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा पूर्वी दाखल केलेला रे.दि.मु.नं.२१३/१९६५ हा बेकायदेशीर असल्याचे जाहीर होऊन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुचा दावा हा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१ हया मयत झाल्या. त्यानंतर वादी यांनी तिचे वारसांना दावेकामी सामील करुन घेतले. त्यानंतर वारसांना दावेचे समन्स देखील काढण्यात आले. दावेचे समन्स प्रतिवादी क्र.१.६ यांना लागून सुध्दा त्या दावेकामी हजर न झाल्यामुळे त्यांचे विरुध्द दि.२२/०४/२०२२ रोजी एकतर्फा आदेश पारीत करणेत आला. त्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.१.६ यांनी नि.१५७ कडे अर्ज देऊन त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद होऊन त्यांची कैफीयत दाखल करुन घेणेकामी परवानगी मागितली आहे. सदर प्रतिवादीचा

नि.१५७ कडील अर्ज मे. न्यायालयाने दि.०२/०२/२०२४ रोजी मंजूर करुन झालेल्या विलंबाबाबत र.रु.१,०००/- कॉस्ट वादी यांना देणेकामी त्यांना आदेशित केले होते. तसेच कॉस्ट न भरल्यास ती दावा खर्चात समाविष्ट करावी असा आदेश पारीत करुन प्रतिवादी १.६ ची कैफीयत व म्हणणे नि. १६० वर दाखल करुन घेतले होते. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर केला तरी वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादीला खर्चाची रक्कमच मिळेल. परंतु, झालेल्या दिरंगाईबाबत प्रतिवादीस र.रु.३००/- कॉस्ट करणे न्यायाचे होईल. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १.६ यांनी दि.०२/०२/२०२४ रोजी झाले आदेशाप्रमाणे झालेल्या विलंबाबाबत र.रु.१,०००/- व दिरंगाईबाबत र.रु.३००/- असे एकूण र.रु.१,३००/- वादींना खर्च (कॉस्ट) म्हणून दयावा.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Date: 2024.04.12 17:52:14 +0530

मिरज **(नि. बा. चव्हाण)**

दिनांक : १२/०४/२०२४ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

मिरज.

*****

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | Sou. A.C. Patil, Grade-3 |
| Court. | : | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj |
| Date. | : | 12.04.2024. |
| Order signed by the Presiding Officer on. | : | 12.04.2024. |
| Order uploaded on. | : | 12.04.2024. |